# मो.म.अडतानी, सदस्य, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, पुणे खंडपीठ, पुणे यांचे समोरील कामकाज

Revision Application No.NS/III/1/2016

१) रामचंद्र पांडुरंग घाडगे, रा.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा
२) हणमंत पांडुरंग घाडगे, रा.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा
३) निवृत्ती हरी घाडगे, रा.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा
४) एकनाथ हरी घाडगे, रा.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा
५) विष्णू हरी घाडगे (मयत तर्फे लक्ष्मण विष्णू घाडगेचे सर्व वारस हेच वारस)

---अर्जदार

**विरुध्द**

१) धिरज तानाजी जाधव, रा.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा
२) सुरज तानाजी जाधव, रा.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा
३) अधिक संभाजी जाधव, रा.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा
४) महेश पुरशुराम जाधव, रा.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा
५) शहाजी भार्गव जाधव, रा.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा
६) यशवंत लक्ष्मण जाधव, रा.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा
७) शशिकांत भार्गव जाधव, रा.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा
८) जगदिश भास्कर पुरोहीत, रा.मसुर, ता.कराड, जि.सातारा
९) विश्वजीत भास्कर पुरोहीत, रा.मसुर, ता.कराड, जि.सातारा
१०) श्रीम.मंदा दिगंबर आचार्य, रा.मसुर, ता.कराड, जि.सातारा
११) श्रीम.अनिता अनिल बोकील, रा.मसुर, ता.कराड, जि.सातारा
१२) श्रीम.उषा भास्कर पुरोहीत, रा.मसुर, ता.कराड, जि.सातारा

---जाबदेणार

मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८
[ संक्षिप्त रुपाने "कुळकायदा" म्हणून संबोधिले आहे. ]
चे कलम ७६ नुसार रिव्हिजन अर्ज.

**वाद मिळकतीचे वर्णन-**

| गाव व तालुका | गट नंबर | क्षेत्र हे.आर | आव्हानित केलेला आदेश क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|
| उंब्रज कराड | 62/4 | 0.67 | उपविभागीय अधिकारी, कराड उपविभाग, कराड, जि.सातारा यांनी त्यांचे समोरील टेनन्सी अपील क्र.५/२०१४ मध्ये पारित केलेला आदेश दि.१२/२/२०१६. |

## न्या य नि र्ण य

प्रस्तुत पुनर्निरिक्षण अर्ज अर्जदाराने उपविभागीय अधिकारी, कराड उपविभाग कराड, जि.सातारा यांनी त्यांचे समोरील टेनन्सी अपील क्र.५/२०१४ मध्ये पारित केलेला आदेश दि. १२/२/२०१६ शी व्यथीत होवून दाखल केलेला आहे.

प्रस्तुत अर्जदारातर्फे विधिज्ञ श्री.यु.एल.पाटील यांचे तर प्रस्तुत जाबदेणार क्र. १ ते ६ तर्फे विधिज्ञ श्री.आर.व्ही.भवरे यांचे युक्तीवाद मी ऐकले आहेत. प्रस्तुत जाबदेणार क्र. ७ ते ११ हे त्यांना नोटिस तामील होवून देखील ते सतत गैरहजर राहिले असल्याने प्रकरण त्यांचे विरूध्द एकतर्फी निकालात घेण्यात आले आहे.

अर्जदाराचे विधिज्ञ श्री.पाटील सादर करतात की प्रस्तुत जाबदेणार क्र.१ ते ६ यांचे पूर्वज लक्ष्मण जाधव यांनी दावा मिळकत प्रस्तुत अर्जदार क्र.१ व २ यांचे वडील पांडुरंग घाडगे यांना सन १९५५ साली गहाण करून दिली होती आणि त्या गहाण खताचे आधारे तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण यांनी कुळ कायद्याचे कलम ३२ग अंतर्गत प्रकरण क्र.३४०/१९६१ अन्वये चौकशी करून त्यांचे आदेश



Scanned with OKEN Scanner

दि.१५/१२/१९६१ अन्वये पांडुरंग घाडगे यांचे तर्फे त्यांना कुळ ठरवून आदेश पारित केला. सदरहू चौकशी दरम्यान प्रस्तुत जाबदेणार क्र.७ ते ११ चे पूर्वज जमीन मालक भास्कर पुरोहित यांनी दावा मिळकतीवर पांडुरंग घाडगे हे कुळ असल्याचे जबाब दिले आहेत. तहसिलदार यांचा सदरहू आदेश आजपावेतो कोठेही आव्हानित झालेला नाही. करिता त्याला अंतिम स्वरूप प्राप्त झाला आहे. प्रस्तुत जाबदेणार क्र. १ ते ६ यांचे पूर्वज लक्ष्मण जाधव यांनी सदरहू आदेशाविरुध्द दि.२४/६/१९६३ रोजी जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार केली होती. त्यांची सदरहू तक्रार खारीज झाल्याबाबत तहसिलदार यांनी त्यांचे पत्र दि.११/६/१९६४ रोजी लक्ष्मण जाधव यांना कळविल्यानंतर देखील त्यांनी कोणतीही अपील दाखल केली नाही. तहसिलदार यांचे कलम ३२ग अंतर्गत आदेश दि.१५/१२/१९६१ नंतर कुळ कायद्याचे कलम ३२एम अंतर्गत खरेदी प्रमाणपत्र देखील प्रस्तुत अर्जदार यांचे पूर्वज यांना दि.२८/९/१९७० रोजी देण्यात आलेला आहे. हे सर्व झाले असतांना नंतर अंदाजे ३० वर्षाचे विलंबाने प्रस्तुत जाबदेणार क्र.१ ते ६ यांनी उपविभागीय अधिकारी यांचेकडे सन १९९१ साली उपविभागीय अधिकारी यांचेकडे तहसिलदार यांचे आदेश दि.१५/१२/१९६१ च्या विरूध्द अपील क्र.३९/१९९१ दाखल केली. उपविभागीय अधिकारी यांनी या अपिलीत त्यांचे आदेश दि.२८/४/१९९९ अन्वये अपील अंशत: मान्य करून प्रकरण प्रस्तुत जाबदेणार क्र.१ ते ६ कुळ ठरविणेबाबत फेरचौकशीचे आदेश दिले. फेरचौकशीत तहसिलदार यांनी प्रकरण क्र.६५/२००१ नोंदवून त्यात त्यांचे आदेश दि.१३/३/२०१४ अन्वये जाबदेणार क्र.१ ते ६ यांना कुळ कायद्याचे कलम ३२ग अंतर्गत कुळ ठरवून दावा मिळकतीची खरेदी किंमत निश्चित केली आणि ती भरल्यानंतर त्यांना कलम ३२एम अंतर्गत खरेदी प्रमाणपत्र देण्याचे आदेश केले आणि पूर्वी सन १९६१ साली याबाबत पारित झालेले आदेश रद्द केले. प्रकरण पूर्वीच रेस ज्युडी केला झाला असतांना आणि तहसिलदार यांना स्वत:चे आदेश रद्दबातल करण्याचे अधिकार नसतांना त्यांनी पारित केलेले आदेश दि.१३/३/२०१४ चूकीचे व नियमबाह्य असल्यामुळे प्रस्तुत अर्जदाराने उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपील क्र.५/२०१४ दाखल केली. पण दुदैवाने उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचे आव्हानित आदेश दि.१२/२/२०१६ अन्वये प्रस्तुत अर्जदाराचे अपील अमान्य करून तहसिलदार यांचा दि.१३/३/२०१४ चा चूकीचा आदेश कायम ठेवलेला आहे. करिता उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांचे आव्हानित आदेश रद्दकरून प्रस्तुत पुनर्निरिक्षण अर्ज मान्य करण्यात यावा अशी त्यांची विनंती आहे.

प्रस्तुत जाबदेणार क्र.१ ते ६ चे विधिज्ञ श्री.भवरे सादर करतात की दावा मिळकतीचे गांव नमुना ७/१२ वरून स्पष्टपणे दिसून येईल की प्रस्तुत जाबदेणार क्र.७ ते ११ चे पूर्वज भास्कर पुरोहित जमीन मालक असून प्रस्तुत जाबदेणार क्र.१ ते ६ यांचे पूर्वज लक्ष्मण यशवंत जाधव हे सन १९३८-३९ सालापासून मिरासी कुळ म्हणून आहेत. लक्ष्मण जाधव यांनी परत बोलीने जमीन घेण्याबाबतच्या हक्काने दावा मिळकत प्रस्तुत अर्जदाराचे पूर्वज पांडुरंग घाडगे यांना गहाण करून दिली होती. पांडुरंग हरी घाडगे यांची फक्त सन १९६२-

६३ आणि नंतर १९६५-६६ पासून काही वर्षासाठी वहिवाट म्हणून नोंद आहे. ते दि.१/४/१९५७ रोजी त्यांची कुळ वहिवाट म्हणून नोंद नाही. गहाण रक्कम फेडल्यानंतर दावा मिळकतीवर सतत आमचा ताबा आहे. कुळ कायद्याचे कलम ४(I)क प्रमाणे गहाणदार म्हणून ताबा धारक जमिनीचा कुळ ठरत नाही. गहाणखताप्रमाणे फेरफार क्र.४५५५, सन १९५५-५६ साली नोंदविण्यात आलेला आहे. तहसिलदार यांनी सन १९६१ साली कलम ३२ग अंतर्गत केलेल्या कारवाईत लक्ष्मण जाधव यांना कोणतीही नोटिस तामील केलेला नव्हता. करिता त्यांना त्या चौकशीत पारित केलेला आदेश दि.१५/१२/१९६१ चे विरूध्द त्यावेळी अपील करता आली नाही. तथापि सदरहू आदेश समजल्यावर आणि याबाबत पांडुरंग घाडगे यांच्याशी चर्चा केल्यावर त्यांनी सुध्दा आम्हीच कुळ असल्याचे मान्य केल्याने आम्ही फक्त सदरहू आदेश रद्द करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडे दि.२४/६/१९६३ रोजी तक्रार केला. सदरहू चौकशीचे प्राप्त झालेल्या कागदपत्रावरून पान क्र.२७/२५ वरून स्पष्टपणे दिसून येईल की पांडुरंग घाडगे यांनी स्वत: होवून दि.१३/११/१९६३ रोजी अर्ज केला आहे की दावा मिळकतीवर लक्ष्मण जाधव कुळ असून सदरहू दावा मिळकतीची कलम ३२ग अंतर्गतची खरेदी लक्ष्मण जाधव यांना करू द्यावी ते स्वत: खरेदी करू इच्छित नाही तसेच लक्ष्मण जाधव यांनी दि.२४/६/१९६३ रोजी केलेल्या तक्रारीचे संदर्भात झालेल्या चौकशीत देखील पांडुरंग घाडगे यांच्या दि.२०/१२/१९६३ रोजी घेण्यात आलेल्या जबाबात त्यांनी तसेच नमूद केले आहे. दि.२६/५/१९५५ च्या लक्ष्मण जाधव आणि पांडुरंग घाडगे मध्ये झालेला दस्त मुदत खरेदी दस्त होता. त्या दस्ताप्रमाणे लक्ष्मण जाधव यांनी गहाण रक्कम फेटाळल्यानंतर तशी नोंद घेण्यासाठी तहसिलदार यांना अर्ज दिल्यावर फेरफार क्र.५३९९ दि.२८/२/१९६३ प्रमाणे पुन्हा लक्ष्मण जाधव यांची नोंद झाली आहे आणि ही नोंद झाल्यानंतर त्यांनी निम्न कोर्टातील प्रक्ररणात पान क्र.२१ वर अर्ज दि.२५/२/१९६३ अन्वये दावा मिळकतीचे कलम ३२ग घाडगे ऐवजी त्यांचे नांवे करण्यासाठी अर्ज दिला. पण दरम्यान कलम ३२ग ची कारवाई श्री.घाडगे यांचे तर्फे झाल्याने तहसिलदार यांनी प्रकरणात पुढील कारवाई कोणत्या प्रकारे करावी याबाबत जिल्हाधिकारी यांचेकडून त्यांचे पत्र दि.४/१२/१९६३ (जुने प्रकरणातील पान नं.४७/४५) अन्वये मार्गदर्शन मागितले. या पत्राचे अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी मामलेदार यांचेकडून अहवाल बोलाविल्यावर मामलेदार यांनी त्यांचे पत्र दि.२५/५/१९६४ अन्वये सन १९६१ चे आदेशाप्रमाणे पांडुरंग घाडगे हे कुळ झाल्याचे कळविले. दरम्यान लक्ष्मण जाधव सन १९६५ साली मयत झाले. करिता मामलेदार यांच्या सदरहू अहवालाबाबत ते पुढे अपील इत्यादी दाखल करू शकले नाहीत आणि या प्रकारे सदरहू प्रकरण त्या वेळी अनिर्णयीत राहिला. लक्ष्मण जाधव यांचे वारसांना सन १९६१-ते-६३ पर्यंत झालेल्या कार्यवाहीबाबत काहीच कल्पना नव्हती. करिता त्यांचे मुलाने सन १९८३ साली दावा मिळकतीची कलम ३२ग अंतर्गत आदेश मिळविणेसाठी तहसिलदार यांचेकडे अर्ज केला. सदरहू आदेशाचे अनुषंगाने चौकशीत पांडुरंग हरी घाडगे यांनी पुन: त्यांचे जबाब दि.६/९/१९८३

(तहसिलदार प्रकरणातील पान नंबर ७१) मध्ये पुन्हा स्पष्ट केले की दावा मिळकतीचे लक्ष्मण जाधव हेच कुळ आहेत. पांडुरंग यांचा पुन्हा स्वत:चा तसा जबाब असल्याने तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण यांनी त्यांचे पत्र दि.८/९/१९८३ अन्वये पूर्वी पांडुरंग घाडगे तर्फे कलम ३२ग झालेला आदेश दि.१५/१२/१९६१ चे पुर्नविलोकन करणेसाठी जिल्हाधिकारी यांची परवानगी मागितली. त्यावर जिल्हाधिकारी यांनी त्यांचे पत्र दि.२८/९/१९८३ अन्वये ते पुर्ननिरिक्षण किंवा पुर्नविलोकन बाबतचा अर्ज सादर करू शकतात असे कळविले. सदरहू सर्व पत्रव्यवहार प्रकरणात उपलब्ध आहे. तथापि तहसिलदार यांनी याबाबतची प्रस्तुत जाबदेणार क्र.१ ते ६ यांना काहीच कल्पना दिली नाही. करिता आम्ही स्वत: होवून नंतर सन १९९१ साली उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपील क्र.३२/१९९१ दाखल केली. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचे आदेश दि.२८/४/१९९९ अन्वये आमची अपील अंशत: मान्य करून प्रकरण फेरचौकशीसाठी तहसिलदार यांचेकडे परत पाठविले. फेरचौकशीत तहसिलदार यांनी प्रकरण क्र.६५/२००१ अन्वये चौकशी करून प्रकरणात वर नमूद केलेली परिस्थितीचा योग्य ऊहापोह करून प्रस्तुत जाबदेणार क्र.१ ते ६ यांना दावा मिळकतीवर हक्क असल्याचे स्पष्ट करून त्यांचे तर्फे कलम ३२ग अंतर्गत खरेदी किंमत निश्चित करून दिली आणि ती भरल्यावर कलम ३२एम अंतर्गत निर्गमीत करण्याचे आदेश दिले. तहसिलदार यांचा सदरहू आदेश योग्य व प्रकरणात प्राप्त परिस्थितीशी सुसंगत असल्याने उपविभागीय अधिकारी यांनी तो आव्हानित आदेशाव्दारे कायम केलेला आहे. करिता सदरहू दोन्ही आदेश कायम ठेवून प्रस्तुत पुर्ननिरिक्षण अर्ज फेटाळण्यात यावा अशी त्यांची विनंती आहे.

दोन्ही विधिज्ञ यांचे युक्तीवाद विचारात घेता आणि प्रकरणातील कागदपत्रे तपासल्यावर माझे निदर्शनास येते की दावा मिळकतीचे गांव नमुना ७/१२ प्रमाणे दावा मिळकतीचे मुळ मालक भास्कर पुरोहित (प्रस्तुत जाबदेणार क्र.७ ते ११ चे पुर्वज) असून या जमिनीवर प्रस्तुत जाबदेणार क्र. १ ते ६ चे पूर्वज लक्ष्मण जाधव यांची दि.१/४/१९५७ चे फार पूर्वीपासून मिरासी कुळ म्हणून नोंद आहे. सदरहू कुळ लक्ष्मण जाधव यांनी दि.२६/५/१९५५ रोजी पांडुरंग घाडगे (प्रस्तुत अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील आणि क्र.३ ते ५ यांचे आजोबा) यांचे सोबत मुदत खरेदीखत करून सदरहू जमीन त्यांचेकडे गहाण ठेवली. या गहाण खताप्रमाणे त्यांचेकडे जमिनीचा ताबा आल्याने सन १९६१ साली तहसिलदार यांचे दि.१५/१२/१९६१ चे आदेशान्वये दावा मिळकतीची कलम ३२ग अन्वये खरेदी पांडुरंग घाडगे यांचे नांवे झाली. तथापि सदरहू चौकशीत लक्ष्मण जाधव यांचा दावा मिळकतीवर कुळ म्हणून नांव नोंदविलेले असतांना सुध्दा त्यांना पक्षकार म्हणून सामील करण्यात आलेले नाही आणि त्यांचे म्हणणे सुध्दा ऐकण्यात आलेले नाही. करिता सदरहू आदेश त्यांना त्यावेळी माहित नव्हते त्याचे विरूध्द अपील दाखल करता आली नाही. सदरहू गहाण दस्ताप्रमाणे त्यांनी रक्कम पांडुरंग घाडगे यांना परत केल्यावर त्यांचे अर्जाप्रमाणे फेरफार क्र.५३९९ दि.२८/२/१९६३ अन्वये



Scanned with OKEN Scanner

त्यांची पुन्हा नोंद झाली आहे. आणि त्यावेळी त्यांना पूर्वीचा ३२ग चा आदेश झाल्याचे माहित झाल्यावर त्यांनी दि.२५/२/१९६३ रोजी (तहसिलदार यांचेकडील प्रकरणात पान क्र.२१) अर्ज करून सदरहू ३२ग पांडुरंग घाडगे ऐवजी त्यांचे नांवे करण्यासाठी अर्ज दिला आहे. तसेच त्यावेळी पांडुरंग हरी घाडगे यांनी देखील स्वतः होवून त्यांचे अर्ज दि.१३/११/१९६३ (तहसिलदार यांचेकडील प्रकरणात पान क्र. २५/२७) आणि त्यांचे जबाब दि.२०/१२/१९६३ मध्ये दावा मिळकतीचे कुळ लक्ष्मण जाधव हेच असून कलम ३२ग त्यांचे (पांडुरंग घाडगे यांचे) ऐवजी लक्ष्मण जाधव यांचे नांवे करण्यात यावी असे स्वतः होवून स्पष्ट केले आहे. पांडुरंग घाडगे यांच्या सदरहू अर्ज व जबाबाचे अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी तहसिलदार यांचा दि.१५/१०/१९६१ रोजीचा आदेश पुर्नविलोकन अंतर्गत घेवून नवीन आदेश पारित करणेसाठी स्पष्ट सूचना देणे आवश्यक होते, पण जिल्हाधिकारी यांनी तशी स्पष्ट सूचना त्यावेळी दिली नाही आणि दरम्यान लक्ष्मण जाधव सन १९६५ साली मयत झाले करिता कलम ३२ग अंतर्गत होणारी फेरचौकशीची आवश्यक कारवाई त्यावेळी करण्यात आली नाही, असे कागदपत्रावरून दिसून येते. नंतर लक्ष्मण जाधव यांच्या मुलाने सन १९८३ साली कलम ३२ग अंतर्गत नवीन अर्ज केल्यावर त्यात पुन्हा पांडुरंग घाडगे यांनी त्यांचे जबाब दि.६/९/१९८३ (पान क्र.७१) अन्वये लक्ष्मण जाधव हेच खरे कुळ असल्याचे नमूद केल्यावर तहसिलदार यांनी जुना आदेश दि.१५/१२/१९६१ चे पुर्नर्निरिक्षण करणे आवश्यक झाल्याने सदरहू प्रकरण पुर्नर्निरिक्षणामध्ये घेण्याची परवानगी जिल्हाधिकारी यांचेकडून मागितली. यावर जिल्हाधिकारी यांनी त्यांचे पत्र दि.२८/९/१९८३ अन्वये अपेक्षित स्पष्ट आदेश न देता लक्ष्मण जाधव यांचे वारस यांनी पुर्नर्निरिक्षण / पुर्नविलोकन अर्ज दिले नसतांना तहसिलदार ~~यांनी~~ हे स्वतःहुन पूर्वीचा आदेश रद्द करण्यासाठी का विनंती करीत आहेत, ~~असे~~ असा उलट तहसिलदार यांचा स्पष्टीकरण मागितले. जिल्हाधिकारी यांचा सदरहू पत्र त्यांचे स्तरावर निष्काळजीपणा व ढवळाढवळी करण्याचा प्रकार दिसतो. तथापि तहसिलदार यांनी लक्ष्मण जाधव यांना पुढे काहीच कळविले नाही आणि गप्प राहिले. त्यामुळे त्यांचे वारसांना, कोणताही पुर्नर्निरिक्षण / पुर्नविलोकन अर्ज देता आला नाही. प्रकरणात उपलब्ध या सर्व कागदपत्रावरून स्पष्टपणे दिसून येते की प्रकरण पुर्नर्निरिक्षण करणे आवश्यक झाले असतांना देखील तहसिलदार व जिल्हाधिकारी यांचेकडून अपेक्षित आवयक कार्यवाही झाली नाही नंतर सन १९९१ साली स्वतः होवून त्यांनी अपील उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल केली. अर्थात ही अपील दाखल करतांना झालेला ३० वर्षाचा विलंब वर नमूद केलेल्या कारणामुळे क्षमापित होण्यास पूर्णतः पात्र दिसतो. उपविभागीय अधिकारी यांनी या अपिलीत त्यांचे आदेश दि.२८/४/१९९९ अन्वये अपील अंशतः मान्य करून प्रकरण फेरचौकशीसाठी तहसिलदार यांचेकडे पाठविलेले आहे. फेरचौकशीत तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण यांनी प्रकरण क्र.६५/२००१ अंतर्गत त्यांचे आदेश दि.१३/३/२०१४ अन्वये लक्ष्मण जाधव यांचे वारस (प्रस्तुत जाबदेणार क्र.१ ते ६) यांना दावा मिळकतीवर कुळ ठरवून त्यांचे



Scanned with OKEN Scanner

तर्फे कलम ३२ग अंतर्गत दावा मिळकतीच खरेदी किंमत निश्चित करून दिली आहे. ज्या अर्थी (१) दावा मिळकतीवर लक्ष्मण जाधव यांचा दि.१/४/१९५७ च्या फार पूर्वी पासून मिरासदार कुळ म्हणून नोंद आहे आणि ती नोंद कधीही आव्हानित झाली नाही आणि ज्या अर्थी (२) कुळ कायद्याचे कलम ४(I)क अन्वये गहाणदार म्हणून ताबा असणारा कुळ ठरत नाही आणि त्यामुळे पांडुरंग घाडगे दावा मिळकतीवर कुळ ठरत नाही आणि ज्या अर्थी (३) पांडुरंग घाडगे यांनी स्वत:च वर नमूद केलेले त्यांचे अर्ज दि.१३/११/१९६३, जबाब दि.२०/१२/१९६३ आणि जबाब दि.६/९/१९८३ मध्ये दावा मिळकतीवर ते कुळ नसून लक्ष्मण जाधव हेच खरे कुळ आहेत असे स्पष्ट केले आहे; त्या अर्थी दावा मिळकतीवर लक्ष्मण जाधव हेच कुळ ठरतात आणि त्या अनुषंगाने वर नमूद केलेले पूर्वी परित झालेला आदेश दि. १५/१२/१९६१ रद्द होवून तहसिलदार यांनी पारित केलेला आदेश दि.१३/३/२०१४ आणि तो कायम ठेवल्याबाबत उपविभागीय अधिकारी यांचा आदेश दि.१२/२/२०१६ सदरहू दोन्ही आदेश प्रकरणात प्राप्त परिस्थितीनुसार योग्य व नियमानुसार आहेत. करिता सदरहू दोन्ही आदेशात पुर्नर्निरिक्षणाव्दारे कोणताही हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही. पांडुरंग घाडगे यांचे वारस प्रस्तुत अर्जदार यांना त्यांचे पूर्वज यांनी केलेल्या कथनाशी विसंगत दावा मिळकतीवर कुळ हक्क मागता येत नाही.

वरील विवेचनाचे अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१) प्रस्तुत पुर्नर्निरिक्षण अर्ज फेटाळण्यात येत आहे.
२) उपविभागीय अधिकारी, कराड उपविभाग कराड, जि.सातारा यांनी त्यांचे समोरील टेनन्सी अपील क्र.५/२०१४ मध्ये पारित केलेला दि.१२/२/२०१६ रोजीचा आदेश कायम करण्यात येत आहे.
३) प्रकरणात यापूर्वी स्थगिती अथवा जैसे-थे-परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिले असल्यास ते उठविण्यात येत आहेत.
४) खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.
५) दोन्ही पक्षकारांना या आदेशाची समज देण्यात यावी.
६) आदेशाची प्रत तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांना देण्यात यावी आणि कार्यालयाचे नस्तीस संग्रहीत ठेवण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner